# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ४८९ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ३१/०८/२०१८

## अनैसर्गीक संभोग करणा—या आरोपीस १० वर्ष सश्रम कारावास व द्रव्य दंडाची शिक्षा

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. संजय देशमुख सर यांचे न्यायालयाचा निर्णय

आज दिनांक ३१/८/२०१८ रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. संजय देशमुख यांनी पोलीस स्टेशन लाखादुर येथील अप.क्र. २७/१६ कलम ३७७ भारतीय दंड विधान सहकलम ३ (१), ४,६ लैगीक अपराधापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ चे गुन्हयात आरोपी नामे सुनिल उर्फ पवण्या शामराव मेश्राम वय ३५ वर्ष रा. भागडी ता. लाखादुर जि. भंडारा यास गुन्हयात दोष सिध्द झाल्याने १० वर्ष सश्रम कारावास व द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, दिनांक २५/३/१६ रोजी महिला फिर्यादीने पोलीस स्टेशन लाखादुर येथे तक्रार दिली की, फिर्यादी तीचे पती, अल्पवयीन मुलगी व पिडीत अल्पवयीन मुलगा वय १ वर्ष यांचेसह शेतीमध्ये सकाळी ०९/०० वा. काम करण्याकरीता गेले होते. सकाळी ११/०० वा. शेतीचे कामे करुन घरी परत येत असता रस्त्यातद पीडीत अल्पवयीन मुलगा आब्यांचे झाडाचे आंबे पाडण्याकरीता थांबला, फिर्यादी पती व मुलीसह घरी निघुन आले. पिडीत अल्पवयीन १२/०० वा. घरी आला व कुणास काही न बोलता खाटेवर झोपुन गेला. सायंकाळी ५/०० वा. मुलगा खाटेवरच रडत होता. त्यास फिर्यादीने का रडत आहे असे विचारले असता सांगीतले की, आंबे पाडुन घराकडे येत असता चुलबंद नदि पार करीत असतांना गावातील सुनिल शामराव मेश्राम याने मासे पकडण्यास जावु असे बोलुन नदिमध्ये मासे पकडण्यास घेवुन गेला व अंगावरील सर्व कपडे काढण्यास सांगीतले. पाण्यामध्ये आरोपीने पिडीत अल्पवयीन मुलासोबत अनैसर्गीक संभोग केला. घटनेचा आघात अल्पवयीन पीडीत मुलाचे मनावर झाला त्यामुळे घटनास्थळावरुन कपडे घालुन मुलगा सरळ घरी निघुन आला. अशी आपबिती पीडीत मुलाने फिर्यादीस सांगीतली. घटनेची गांभीर्य लक्षात घेवुन फिर्यादीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली. सदर तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस उप निरीक्षक प्रमोद राउत यांनी तत्कालीन पोलीस निरीक्षक यांचे आदेशाने कलम ३७७ भारतीय दंड विधान सहकलम ३ (१), ४,६ लैगीक अपराधापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ तात्काळ गुन्हा नोंद करुन गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक पी. जी. निंबेकार यांचेकडे दिला. तपासी अधिकारी यांनी गुन्हयात आरोपी नामे सुनिल शामराव मेश्राम यास अटक केली. पीडीताची वैधकीय तपासणी केली. आरोपी विरुध्द भक्कम पुरावा गोळा करुन जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे गुन्हयाचे दोषारोप पत्र दाखल केले. सदर गुन्हा केस क्र. १८/१६ नुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश भंडारा यांचे समक्ष सुनवनी करीता ठेवण्यात आले. सदर गुन्हयांची सरकारी अभियोक्ता म्हणुन प्रमोद भुजाडे यांनी काम पाहीले. गुन्हयात योग्य साक्ष पुरावा मा. न्यायालयासमोर आनला. सदर साक्ष पुरावा आरोपी विरुध्द दोषसिध्द करण्यास

योग्य साक्ष पुरावा मा. न्यायालयासमोर आनला. सदर साक्ष पुरावा आरोपी विरुध्द दोषसिध्द करण्यास महत्वाचा ठरला. सदर गुन्हयाचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेता आज रोजी मा. न्यायालयाने आरोपी विरुध्द दोषसिध्द झाल्याने कलम ३७७ भादवी मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व २००० हजार रुपये द्रव्य दंड, दंड न भरल्यास ३ वर्ष साधा कारावास, कलम ४ लैगीक अपराधापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२, ७ वर्ष सश्रम कारावास व २ वर्षाची शिक्षा, २००० हजार रुपये दंड, कलम ६ लैगीक अपराधापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२, १० वर्ष सश्रम कारावास व २००० रुपये दंड, सदर शिक्षा एकत्रीत भोगण्याबाबत आदेशित केलेले असुन मा. न्यायालयाने जिल्हा न्यायप्राधिकारणा मार्फत पिडीत अल्पवयीन बालकास वय व आर्थीक परिस्थिती लक्षात घेवुन योग्य नुकसान भरपाई अदा करण्याची आदेश दिले. सदर गुन्हयात दोषशिध्दी होणे करीता पोलीस निरीक्षक मेश्राम पो. स्टे. लाखादुर यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार सुरेश भलावी पोलीस स्टेशन लाखादुर यांनी न्यायालयात योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामाकाज पाहीले.

भंडारा जिल्हा पोलीस दल व सरकारी अभियोक्ता जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा यांचेकडुन जनतेस आव्हाहन करण्यात येते की, गुन्हे तपासामध्ये नागरीकांनी पंच व साक्षीदार म्हणुन पोलीस तपासात मदत करावी आणि आरोपी विरुध्द साक्ष देणेकरीता न्यालयात हजर राहावे.

(जितेद्र के.आडोळे)
पोलीस उप निरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता